ePaper

## इतिहासाचा विपर्यास करणारी नाटके नकोत! शरद पवार

| वर्ष - 7 | अंक - 239 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- टीम इंडियात कुणाला संधी मिळणार?
- बिपाशा कमवते करोडो रुपये
- निवडणुकांसाठी भाजपचा मास्टरस्ट्रोक
- विद्यार्थ्याला मिळाले 200 पैकी 214

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 8 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## 2019 मध्ये 'कट्यार पाठीत घुसली' चा प्रयोग

# आम्ही केला 'आता होती गेली कुठे?' चा!

### » माजी मुख्यमंत्री उद्धव ठकरे यांच्यावर निशाणा : फडणवीस

**| पिंपरी | महाईन्यूज | |**

**आपल्याकडे तिसरी घंटा वाजली की नाटक सुरू होते. आमच्याकडे आचारसंहितेची तिसरी घंटा वाजली की आम्ही तयारीला लागतो. पण, चांगल्या तालमी केल्या की प्रेक्षकांचा आशीर्वाद मिळतो, तसा आम्हालाही मिळतो. ज्यांनी केवळ नाटकं केली, त्यांना लोक घरी बसवतात.**





२०१९ साली 'कट्यार पाठीत घुसली', हा प्रयोग झाला. मग २०२२ साली आम्ही प्रयोग केला, 'आता होती गेली कुठे?' त्यामुळे अशाप्रकारचे प्रयोग चालूच असतात," असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करत तुफान फटकेबाजी केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मानेला पट्टा दिसला की 'सिंहासन' सिनेमा आठवतो. पण, आत्ताच्या मुख्यमंत्र्यांना पट्ट्याची गरज पडली नाही, असं म्हणत फडणवीस उद्धव ठाकरेंना उद्देशून बोलले. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "पूर्वीच्या काळी नाट्यसंमेलनात राजकीय नेत्यांना बोलावण्यावरून खूप वाद व्हायचे. वृत्तपत्रांमध्ये मथळेच्या मथळे छापण्यात येत होते. पण, अलीकडे हे कमी झालंय, कारण तुम्ही आम्हाला आपल्यातील एक समजता. तुमचा ठाम विश्वास झालाय की, हे नाटक करतातच. त्यामुळे राजकीय नेत्यांना नाट्य संमेलनात बोलावलं पाहिजे." "मुख्यमंत्री झाल्यासारखं वाटून गेलं की, किती प्रश्न सुटतील" "प्रशांत दामले शनिवारी म्हणाले, 'अध्यक्ष झाल्यावर मला मुख्यमंत्री झाल्यासारखं वाटलं.' ही कला आमच्या राजकारणातील काही लोकांना दामलेंनी शिकवावी. मुख्यमंत्री झाल्यासारखं वाटून गेलं की, किती प्रश्न सुटतील. पण, तुम्ही असे मुख्यमंत्री आहात, जे जनतेला हसवतात, रडवतात आणि संवेदनशिलतेसाठी तुमचं कार्य महत्वाचं आहे," असं कौतुक फडणवीसांनी केलं.

### आत्ताच्या मुख्यमंत्र्यांना पट्ट्याची गरज नाही

» आम्हाला परिस्थितीनुसार नाटक किंवा सिनेमाचं अनुसरण होतं. जसं मुख्यमंत्र्यांच्या मानेला पट्टा दिसला की 'सिंहासन' सिनेमा आठवतो. आत्ताच्या मुख्यमंत्र्यांना पट्ट्याची गरज पडत नाही. मी कुणाबद्दल बोलतोय, हे सांगण्याची आवश्यकता देखील नाही," असा अप्रत्यक्षपणे खोचक टोला फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे.


# मोशीत पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी!

### » पालिका प्रशासनाची डोळेझाक : स्थानिक नागरिकांमध्ये संताप

**| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून पाणीपुरवठ्यावर कोट्यावधी रुपये खर्च केले जात असतानाही नागरिकांना ड्रेनेज मिश्रित पाणी प्यावे लागत असल्याचे चित्र आहे. मोशीतील संतनगर सेक्टर नंबर चार परिसरात मागील तीन आठवड्यापासून ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत आहे. अतिशय दूषित, अळ्या असलेले पाणी येत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.**

दुर्देव म्हणजे स्मार्ट सिटीतील अधिकाऱ्यांना 21 दिवसांपासून लिकेज सापडत नाही. महापालिका चिखली आणि निगडीतील जलशुद्धीकरणातून शहरवासीयांना पाणीपुरवठा करते. मोशी परिसर दाट लोकवस्तीचा आहे. या भागात मोठ मोठ्या गृहनिर्माण संस्था विकसित झाल्या आहेत. या भागात सातत्याने विस्कळीत पाणीपुरवठा राहतो. संतनगर सेक्टर नंबर 4 केंद्रीय विहार शेजारी शिंवगंगा सिद्धी अपार्टमेंटसह विविध सोसायट्या आहेत. या परिसरात होणारा पिण्याच्या पाणीपुरवठ्यात गेली तीन आठवड्यांपेक्षा अधिक कालावधीपासुन ड्रेनेजचे पाणी



मिक्स होत आहे. पाण्यात अळ्या येत आहेत. हे पाणी वापरण्यात आल्याने लहान मुले तसेच जेष्ठ नागरिक यांना घसा, उलट्या तसेच जुलाबाचा त्रास होत आहे. याबाबत स्थानिक माजी नगरसेवक विलास मडिगेरी यांनी दखल घेऊन पाईपलाईन वॉश आऊट केली. तसेच नवीन चेंबर तयार करुन उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. परंतु अजूनही प्रश्न सुटलेला नाही. महापालिकेच्या वतीने जेसीबी पाठवून रस्त्यावर आठ ते दहा ठिकाणी खोदकाम करण्यात आले.परंतु, ती आठवड्यानंतरही परिस्थिती 'जैसे थे' आहे. पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी येतात, खोदतात आणि लिकेज सापडत नाही अशी परिस्थिती आहे.दुर्देव म्हणजे स्मार्ट सिटीतील अधिकाऱ्यांना 21 दिवसांपासून लिकेज सापडत नाही या भागात सातत्याने विस्कळीत पाणीपुरवठा राहतो. संतनगर सेक्टर नंबर 4 केंद्रीय विहार शेजारी शिंवगंगा सिद्धी अपार्टमेंटसह विविध सोसायट्या आहेत.

### नागरिकांना आर्थिक भुर्दंड...

» पिंपरी-चिंचवड महापालिकेचा स्मार्ट सिटीत समावेश झालेला आहे. शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा सक्षम असल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र अधिकाऱ्यांना एवढे खोदकाम करुनही फॉल्ट सापडत नसेल. तर ही घटना आश्चर्यकारक असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. अगोदरच एक दिवसाआड पाणीपुरवठा आणि तेही दूषित पाणी येत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. हजारो रुपयांचा मालमत्ता कर भरूनही नागरिकांवर पिण्यासाठी पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. तसेच या घाण पाण्यामुळे पाण्याचा टाक्या साफ करण्याचा नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

# मराठी माणूस इतिहास विसरतोय

## » मराठी कलाकरांनी एकमेकांना मान द्यायलाच हवा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**100 व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनात (100TH AKHIL BHARTIYA MARATHI NATYA SAMMELAN) मनसे अध्यक्ष राज ठाकरे (RAJ THACKERAY) यांची मुलाखत घेण्यात आली. यावेळी राज ठाकरे यांनी त्यांच्या नाटकाविषयीच्या प्रेमाबद्दल भाष्य केलं. नाटक पाहिलेला माणूस हा महाराष्ट्रात नाही असं होणारच नाही, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.**

जसं आमच्या भाषणाला रिटेक नाही, तसं नाटकाला ही रिटेक नसतो. खरं तर हल्ली सकाळी सकाळी बातमी पाहिली की म्हणावं वाटतं की थोडं रिटेक घ्या, असं म्हणत राज ठाकरे यांनी खोचक टोला लगावला. या मुलाखतीदरम्यान राज ठाकरे यांनी मराठी कलाकरांचे कान टोचलेत. मराठी कलाकरांनी व्यासपीठावर,चारचौघात एकमेकांना मान द्यायलाच हवा असं राज ठाकरे यांनी म्हटलं. पुण्यात 100 व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलानाचे आयोजन करण्यात आले आहे. या नाट्यसंमेलानादरम्यान दीपक करंजीकर यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीदरम्यान राज ठाकरे यांनी त्यांच्या नाटकाच्या प्रेमाविषयी भाष्य केलं. तसेच त्यांनी मराठी कलाकरांना देखील सल्ले दिले. खरं तर मला हुरहूर होती, की दुपारच्या जेवणानंतर मंचासमोर कोणी असेल का? की फक्त प्रश्न-उत्तरं होतील असं वाटलं होतं. पण तुम्ही उपस्थित आहात, त्याबद्दल आभार. आता विषय काय आहे, "नाटक आणि मी" त्यापेक्षा "मी आणि माझी नाटकं" असा विषय असता तर तो विषय खूप रंगला असता, मात्र आयोजकांना त्यात रसचं नाही. आता नाटक म्हणून



माझी मुलाखत घ्यावी इतकं माझ्यात काही नाही, फक्त नाटक एवढंच माझ्यात आहे, असं राज ठाकरे यांनी म्हटलं. आपला मराठी माणूस हा महाराष्ट्राचा इतिहास विसरला आहे. खरं तर आपण राज्यकर्ते होतो आपण, देशाचा पंतप्रधान मराठा साम्राज्याने बसवला. आपण सगळे जातीपातीत भांडत बसलोय. आता ही जात पात फक्त राजकारणात नाही तर नाटकात, शाळेत ठिकठिकाणी आलेली आहे. हे दुर्दैव आहे. मराठी कलाकारांनी एकमेकांना मान द्यायला हवा. पहिली आणि शेवटची गोष्ट तुम्ही कलाकारांनी एकमेकांना मान दिला नाही अन नको त्या नावाने एकमेकांना हाका देत बसलात तर मराठी चित्रपटसृष्टीतून एक ही स्टार निर्माण होणार नाही. इतर राज्यातील कलाकारांकडे बघा. रजनीकांत आणि इलाहीराजा रात्री एकत्र बसून दारू बसत असतील, मात्र मंचावर आले की ते एकमेकांना सर म्हणून आदर देतात. मराठी कलावंतांनी याचं अनुकरण करायला हवं. मानसन्मान द्या. तुम्ही जर नाक्यावर उभं राहिला तर तुम्हाला कोणी पैसे देऊन पाहायला येणार नाही. आज अशोक सराफ हे चौकात उभे राहिल्याचे दिसले नाहीत, म्हणून मी पैसे मोजूनचं त्यांना पाहायला जाईन. आता इथं प्रशांत दामले अध्यक्ष आहेत. आता मी चार भिंतीत त्यांना काहीही म्हणेन, मात्र इथं मी त्यांना सर म्हणेन. आता अशोक सराफांना हे काय म्हणतात मामा, अरे तुझा काय सख्खा मामा आहे का? अरे सर म्हणा ना? आता शरद पवार इथं आले तर मी त्यांना वाकून नमस्कार करेन, कारण ते वरिष्ठ नेते आहेत. माझ्या भाषणात मी त्यांच्यावर बोलेन मात्र समोर आल्यावर त्यांचा त्यांना मानसन्मान देईनच. त्यामुळं मराठा कलावंतांनी ही गोष्ट पाळायला हवी, असं म्हणत राज ठाकरे यांनी मराठी कलावंतांचे कान टोचलेत. मला निवडणूक लढायला लाज वाटते. कारण गेली 70 वर्षे काय तर माझे आजोबा, काका जे बोलले आज मी ही तेच बोलतोय. अरे तेच ते विषय, मग आपण पुढं कधी जाणार? नाटक, कलाकार, साहित्यिक हे नसते तर कधीच अराजकता आली असती. कारण लोक तुमच्यात गुंतून पडला त्यामुळं दुसरीकडे दुर्लक्ष झालं. तुम्ही जर रात्रीच्या मालिका बंद केल्या तर सासू सुनांमध्ये खरी भांडणं होतील. म्हणून तुमचे आभार, असं राज ठाकरे यांनी म्हटलं. मी लतादींदींना जेव्हापासून भेटलो तेव्हापासून त्यांनी माझ्यावर मुलासारखं प्रेम केलं. लताताईंनी माझ्याशी संवाद साधताना ते प्रेम दिलं. पहिला फोन आला तेव्हा मी त्यांना म्हटलं तुम्ही का फोन केला, मग मीच जाऊन भेटलो. त्यांचे आणि माझे संबंध खूप घनिष्ठ होते. सध्या मी त्यांच्यावरील पुस्तकाचं काम करतोय.

### तर सासू सूनेत खरी भांडणं होतील

» मला निवडणूक लढायला लाज वाटते. कारण गेली 70 वर्षे काय तर माझे आजोबा, काका जे बोलले आज मी ही तेच बोलतोय. अरे तेच ते विषय, मग आपण पुढं कधी जाणार? नाटक, कलाकार, साहित्यिक हे नसते तर कधीच अराजकता आली असती. कारण लोक तुमच्यात गुंतून पडला त्यामुळं दुसरीकडे दुर्लक्ष झालं. तुम्ही जर रात्रीच्या मालिका बंद केल्या तर सासू सुनांमध्ये खरी भांडणं होतील. म्हणून तुमचे आभार, असं राज ठाकरे यांनी म्हटलं. 100 व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनात मनसे अध्यक्ष राज ठाकरे (RAJ THACKERAY) यांची मुलाखत घेण्यात आली.

# मोहोळ खून प्रकरणातील आरोपींना कोर्टात आले रडू

## » आपली बाजू मांडतांना यातील वकिलाला अक्षरशः रडू कोसळले

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील (PUNE) कुख्यात गँगस्टर शरद मोहोळच्या (SHARAD MOHOL MURDER CASE) हत्या प्रकरणात पुणे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींमध्ये दोन वकिलांचा सुद्धा समावेश आहे. पोलिसांनी या दोन्ही वकिलांना अटक केल्यावर न्यायालयात हजर केले होते. दरम्यान, न्यायालयात आपली बाजू मांडतांना यातील एक वकिलाला अक्षरशः रडू कोसळले. तसेच आम्ही काहीही केले नाही, असेही हे वकील यावेळी म्हणाले.**

शरद मोहोळ खून प्रकरणात 6 तरुणांसह 2 वकिलांना पोलिसांनी अटक केली आहे. तसेच, या सर्व आरोपींना पोलिसांनी शनिवारी न्यायालयात हजर केले होते. यातील दोन्ही वकिलांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. ॲड रवींद्र पवार आणि ॲड संजय उड्डाण असे या वकिलांचे नाव आहे. मात्र, यावेळी न्यायालयासमोरच यातील एका वकिलाला रडू आल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, न्यायालयात आपली भूमिका मांडतांना वकील म्हणाले की, "आम्हाला आरोपींचा फोन आला की, त्यांनी खून केला असून, त्यांना सरेंडर व्हायचे आहे. आम्हीही त्यांना तोच सल्ला देत, त्याची माहिती पोलिसांना फोनद्वारे



कळविली" असे या वकिलांनी न्यायलायात सांगितले. आरोपींना पकडण्यासाठी आलेल्या गुन्हे शाखेच्या पोलिसांनाही आम्ही तेच सांगितले. पण पोलिसांनी आमचे ऐकले नाही" अशा शब्दात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या एका वकिलाने आपली बाजू मांडली. तर, आम्ही 15 वर्ष वकील व्यावसायात आहोत, आम्ही काहीही केले नाही, असे सांगताना दुसऱ्या वकिलास न्यायालयातच अश्रू अनावर झाले. शरद मोहोळ हत्याकांडातील आरोपींची ओळख पटली असून, एखाद्या चित्रपटातील कथेप्रमाणे नियोजन पद्धतीने ही हत्या करण्यात आली आहे. शरद मोहोळची हत्या करणारे मारेकरी त्याचे साथीदार म्हणून गेल्या काही दिवसांपासून त्याच्या टोळीत काम करत होते. यातील साहील पोळेकर हा तर हत्येच्या आधी काहीवेळ शरद मोहोळच्या घरी त्याच्या लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यात देखील सहभागी होता. वरवर शरद मोहोळचे साथीदार असल्याचे दाखवणारे हे मारेकरी शरद मोहोळच्या गटात त्याला संपवण्यासाठीच सहभागी झाले होते अशी चर्चा आहे.

### मोहोळचा 'विश्वास'घात झाला...

» विशेष म्हणजे, विठ्ठल गांडले याच्यासोबत शरद मोहोळची मुळशी तालुक्यात जुनी भांडणे होती. तर साहील पोळेकर याच्यासोबत देखील जमीन आणि पैशांच्या देवाणघेवाणीतून वाद झाले होते. याचाच राग मनात ठेवून त्यांनी शरद मोहोळसोबत जाण्याचा निर्णय घेतला. काही दिवस त्याच्यासोबत राहून त्याचा विश्वास संपादन केला आणि त्यानंतर शरद मोहोळच्या हत्येची योजना आखली. अतिशय थंड डोक्याने नियोजन करत त्यांनी ही हत्या केली असल्याचे बोलले जात आहे.

## जगातील 103 देशांना भारताने लस पुरवठा केला

# डॉक्टर विकसित भारताचे ‘ॲम्बॅसिडर’!

### महाआरोग्य शिबिरामुळे शेवटच्या घटकाची सेवा : बावनकुळे

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**: प्रभू श्रीराम जन्मभूमी अयोध्यामध्ये मंदिर आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त देशभरात दिवाळी साजरी होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आपल्या पिढीला हा दिवस पहायला मिळाला. “आत्मनिर्भर भारत” हा मोदींचा संकल्प आहे. कोविड काळात १२० कोटी भारतीयांना लस देवून आरोग्य सेवा दिली.**



जगातील १०३ देशांना भारताने लस पुरवठा केला. ‘विकसित भारत... आत्मनिर्भर भारत’ या निर्धाराला साथ देण्यासाठी डॉक्टर विकसित भारत संकल्पनेचे ‘ॲम्बॅसिडर’ आहेत, असे मत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर लोकनेते स्वर्गीय लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त अटल महाआरोग्य विनामूल्य शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भेट दिली. त्यावेळी बावनकुळे बोलत होते. यावेळी चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर माई ढोरे, प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, प्रदेश महासचिव विक्रांत पाटील, भाजपाचे संदीप खर्डेकर, संजीवीनी पांड्ये, आरोग्य सेवाचे सहसंचालक राधाकिशन पवार, डॉ. सचिन देसाई, डॉ. लक्ष्मण गोफणे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, समाजाच्या शेवटच्या व्यक्तीचे कल्याण होईल, असे लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचे सूत्र होते. जीवन किती जगले, यापेक्षा कसे जगले? हे महत्त्वाचे आहेत. तसेच, “भाऊ कसा असावा? याचे आदर्श उदाहरण म्हणजे शंकर जगताप आहेत.” लक्ष्मण जगताप यांचे कार्य त्यांनी सक्षमपणे पुढे चालवले आहे. आदर्श पत्नी म्हणून आमदार अश्विनी जगताप लक्ष्मण जगताप यांचा वारसा चालवत आहेत, असे गौरोद्गारही प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी काढले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. सूत्रसंचालन नाना शिवले आणि आभार माजी महापौर माई ढोरे यांनी मानले.

> “ अंत्योदयाच्या विचाराने आयोजित केलेल्या अटल महाआरोग्य शिबिरामध्ये लाखो नागरिकांना आरोग्य सुविधेचा लाभ होणार आहे. गोरगरिबांसाठी त्यामुळे आधार मिळाला आहे. हे कार्य ईश्वरीय आहे. त्याची प्रेरणा स्व. लक्ष्मण जगताप आहेत. त्या प्रेरणेतून शहराध्यक्ष शंकर जगताप आणि आमदार अश्विनी जगताप काम करीत आहेत.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे,** प्रदेशाध्यक्ष, भाजपा.

# पिंपरी-चिंचवडमधील बांधकामे नियमित करणार

### कोणालाही बेघर करणार नाही: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

। मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**तत्कालीन आघाडी सरकारने पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांवर लादलेला झिजिया शास्तीकराचे भूत हटविले. शास्तीकराचे ओझे कमी करत सर्वसामान्य नागरिकांचे 650 कोटी रुपये आम्ही माफ केले. आता शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला जाईल. कोणालाही बेघर करणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**




मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसंकल्प अभियान सभा किवळे येथील मुकाई चौकात शनिवारी पार पडली. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार विजय शिवतारे, इरफान सय्यद, शीतल म्हात्रे, जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख निलेश तरस यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत शिवसंकल्प अभियानाची सुरुवात केली. आपले सरकार आल्याने लोकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येतो, लोक उत्स्फूर्तपणे स्वागत करतात. दीड वर्षात एकही दिवस सुट्टी घेतली नाही. राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात गेल्याचे काही लोक म्हणतात. पण, आपले राज्य उद्योगामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. गतिमान पद्धतीने हे सरकार चालले आहे. लोक, जनहिताचे निर्णय घेतले. हे निर्णय सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविले पाहिजेत. महायुतीच्या माध्यमातून लोकसभा निवडणूक लढविणार आहेत. युती म्हणून आम्ही मते मागितली, सर्वसामान्य लोकांनी युती म्हणून मतदान केले होते. पण, निकाल आल्यानंतर काही लोकांनी सर्व दरवाजे उघडे आहेत म्हणत काँग्रेसला डोक्यावर घेतले. सत्तेसाठी बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली दिली. महाविकास आघाडी सरकारमध्ये आपला विश्वास फोल ठरला. शिवसैनिकांचे खच्चीकरण होऊ लागले, अन्याय होऊ लागला. संघटना कमकुवत होत होती. आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नव्हतो. मला कोणताही स्वार्थ नाही. शिवसेना, धनुष्यबाण, शिवसैनिकांचे खच्चीकरण थांबविण्यासाठी निर्णय घेतला. गहाण ठेवलेला धनुष्यबाण वाचविला.

## उंटावरून शेळ्या हाकत नाही..

**» शिवसैनिकांला मुख्यमंत्री बनवतो म्हणून स्वतःच मुख्यमंत्री झाले. खुर्चीवर बसले. मला मुख्यमंत्री केले नाही, याचे दुःख नाही. परंतु, मुख्यमंत्री बनून काय कमविले याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. आरोप करून भागणार आहे का याचा विचार करावा. मी बाळासाहेब, शिवसेनेच्या भूमिकेबाबत तडजोड करणार नाही. त्यामुळे लोक माझ्यासोबत येत आहेत. खरी शिवसेना आपली आहे कारण धनुष्यबाण आपल्याकडे आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी एवढ्या पुरते माझे काम नाही. संपूर्ण महाराष्ट्र माझा परिवार आहे. घरात बसून उंटावरून शेळ्या हाकत नाही, असा टोलाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगविला.**




# मग, प्रचार कोण करेल?



**काँग्रेसमध्ये सध्या बैठकाच बैठका होत आहेत. बदलाचं सत्र सुरू झालेलं दिसतंय. मध्य प्रदेशमध्ये जितू पटवारींना प्रदेशाध्यक्ष करून कमलनाथांचं राज्य खालसा केलं. इंदौरच्या राऊ मतदारसंघातून पटवारींना पराभव स्वीकारावा लागला तरी, तरुण पिढीकडं नेतृत्व देण्याची हीच वेळ होती.**

खरं तर विधानसभा निवडणुकीआधी वर्षभर तरी पटवारींकडं मध्य प्रदेशची सूत्रं सोपवायला हवी होती अशी चर्चा आता होताना दिसते. राज्यातील काँग्रेसचे तरुण नेते म्हणाले की, आमच्याकडं जमिनीवर उतरून काम करणाऱ्या नेत्यांकडं नेतृत्व सोपवलं जातं.. तेवढयात त्यांना कोणी तरी विचारलं की, तुम्ही लोकसभा निवडणूक लढणार का?, त्यावर ते म्हणाले की, मग, राज्यात प्रचार कोण करणार?.. या नेत्याविरोधात कितीही बोललं गेलं असलं तरी, महाराष्ट्रात हाच नेता धडाक्यात प्रचार करणारा आहे, हे दिल्लीतही वरिष्ठांना पटलेलं आहे. त्यामुळं या नेत्याविरोधात कोणी कितीही तक्रारी केल्या तरी या नेत्याला काहीच फरक पडत नाही! असं दिसतंय की, लोकसभेसाठी पुण्याची जागा काँग्रेस लढवेल. तिथं यावेळी भाजपशी साटंलोटं करणाऱ्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता नाही. पुण्याची जागा खरोखरच काँग्रेसनं लढवली तर जंगी लढाई होईल. नांदेड कदाचित अशोक चव्हाण लढवू शकतील. सोलापूरमधून काँग्रेसच्या श्रेष्ठींना सुशीलकुमार शिंदेंनी मैदानात उतरावं असं वाटत असलं तरी त्यांची मुलगी प्रणेती शिंदेंना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. काँग्रेसने लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ नागपूरमधून फोडून कार्यकर्त्यांना योग्य संदेश दिलेला आहे. नागपूर सभेच्या आयोजनाबद्दल खरगेंनी प्रदेशाध्यक्ष-प्रभारी आणि इतर वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत प्रचंड प्रदेश काँग्रेसचं प्रचंड कौतुक केलं असं म्हणतात. या सभेत खरगेंनी मराठीमध्ये भाषण करून लोकांचीही मनं जिंकली होती. खरगे मराठीमध्ये संवाद साधू शकतात. त्यांना कर्नाटकप्रमाणं महाराष्ट्राचं राजकारणही माहिती आहे, तिथले नेतेही माहिती आहेत. त्याचा फायदा जागावाटपामध्येही होऊ शकेल. शिवाय, कर्नाटकमध्ये मतदारसंघनिहाय आखणी करून काँग्रेसने विजय मिळवला तशी रणनीती लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातही केली जाऊ शकते. यावेळी महाराष्ट्रातून लोकसभेत विरोधी खासदारांचा आकडा वाढेल हे निश्चित. राजस्थानमध्ये विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू असताना एक गोष्ट स्पष्ट होती, वसुंधरा राजे पुन्हा मुख्यमंत्री होणार नाहीत! मोदी-शहांशी दोन हात केल्यावर राजेंना मुख्यमंत्री कसे होता येईल, असा प्रश्न लोकांकडून विचारला जात होता. एकदा राजेंना बाजूला केल्यावर मैदान मोकळे झाले होते, मग तिथे मुंग्या गोळा व्हाव्यात तशी नेत्यांची नावे फिरायला लागली होती. राज्यवर्धन राठोड, राजेंद्र राठोड, दिव्या कुमारी ही राजपूत नेत्यांची नावे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत होती. राज्यवर्धन यांना निवडणूक जिंकताना घाम फुटला होता, दुसरे राठोडांचा मतदारसंघ बदलून केंद्रानेच घात केला होता. या राठोडांनी निवडणुकीत मार खाल्ला. मैदानात कोणी नाही हे बघून हळूच लोकसभाध्यक्ष ओम बिर्लांनी आपलं नाव पुढं केलं अशीही चर्चा रंगली होती. कोटामधला गोंधळ सांभाळता येईना पण, मुख्यमंत्रीपद हवं, अशी घाई बिर्लांना झालेली दिसली. मध्येच कोणी तरी अर्जुन मेघवाल यांचं नाव घेतलं. राजस्थानसारख्या अत्यंत जातीयवादी समाजामध्ये दलित मुख्यमंत्री झाला तर क्रांती घडेल असं कोणाला वाटलं असेल! या सगळयामध्ये निवडणुकीच्या अखेरीस बाबा बालकनाथ नावाच्या हरियाणातील मठाधिपतीची हवा निर्माण झाली. दिल्लीतला अख्खा मीडिया त्यांच्या मागं धावला होता. ते निवडून आले खरे पण, ते खासदारकीचा राजीनामा देण्यासाठी नव्या संसद भवनात आले तेव्हा त्यांच्याभोवती गराडा पडला होता, त्यामध्ये पत्रकारांचाही समावेश होता. भाजपचे नेते मीडियाला भुरळ घालण्यात पटाईत आहेत. बाबा बालकनाथ तर आधीपासून हेच करत होते. बालकनाथांचा प्रचार इतका प्रक्षोभक होता की, हिंदूत्ववादी लोकांना त्यांनी जणू संमोहित केलेलं होतं. हरियाणातील या योगीवरून लोकांमध्ये कमालीची भांडणं झालेली पाहिली आहेत. योगी बाबा बालकनाथ हेच राजस्थानचे नवे मुख्यमंत्री होतील असं ठामपणे लोक बोलू लागले.

## संपादकीय »

### ऱ्हासपर्व

***वॉशिंग्टनमधील हल्लेखोरांना चिथावणी दिल्याबद्दल ट्रम्प यांना अपात्र ठरवावे की नाही, याचा फैसला आता तेथील सर्वोच्च न्यायालय करेल..***

'संविधानास समर्थन देण्याची विधिवत शपथ घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीस केंद्रीय किंवा राज्यातील पद स्वीकारण्यापासून प्रतिबंधित केले जाऊ शकते, जर.. अशी व्यक्ती त्याच संविधानाविरोधात उठाव अथवा विद्रोहकृत्यामध्ये सहभागी होते, किंवा अशी कृत्ये करणाऱ्यांस पाठबळ वा नैतिक समर्थन देते'.. जवळपास दीडशे वर्षांपूर्वी अंतर्गत यादवीनंतर लगेच संविधानामध्ये या स्वरूपाची घटनादुरुस्ती अमेरिकेच्या कायदेमंडळात किंवा काँग्रेसमध्ये करण्यात आली. मुख्य उद्देश पराभूत परंतु गुलामीवादी 'कन्फेडरेट' राज्यकर्त्यांना अमेरिकी राजकारणाच्या मुख्य प्रवाहात पुनप्रवेश करण्यापासून रोखणे हा होता. अमेरिकेतील अंतर्गत यादवी किंवा सिव्हिल वॉरच्या मुळाशी गुलामगिरीची राजमान्यता काढून घेणे हाच मुद्दा होता. यातूनच तेरा दक्षिणी राज्यांची 'कन्फेडरसी' आणि उर्वरित राज्यांची 'युनियन' यांच्यात तुंबळ युद्ध झाले.

**देशात सगळे काही नीट सुरू आहे, विकासाची फळे सगळ्यांपर्यंत पोहोचली आहेत आणि त्यामुळे इथे प्रत्येकजण आनंदी आहे, असा सरकारचा दावा आहे. तसे असेलही, नव्हे आहेच, पण आनंदी असणारे लोक आणि नसणारे लोक यांचे प्रमाण व्यस्त आहे, बेरोजगारीने, महागाईने त्रस्त लोकांपर्यंत सरकार पोहोचत नाही, त्याचे काय?**

# कोण आहे आनंदी? तुम्ही आहात?

हा २०२४ या वर्षांमधला पहिलाच लेख आहे. मी तुम्हाला नवीन वर्षाच्या पुन्हा एकदा शुभेच्छा देतो. आनंद हा वेगवेगळया गोष्टींशी निगडित असतो. भारतात १४२ कोटी लोक आहेत, हे सगळेच वेगवेगळया स्तरातील लोक आहेत आणि मला प्रश्न पडतो यांच्यापैकी कोण आनंदी आहे आणि कोण नाही? अलीकडच्या काही दिवसांत, भारतात प्रत्येकजण आनंदी असल्याच्या सरकारच्या दाव्याचे जोरदार समर्थन करणारे अनेक लेख मी वाचले आहेत. या लेखकांचा दावा आहे की, भारतात अभूतपूर्व आर्थिक विकास झाला आहे आणि त्याचे फायदे समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले आहेत. अर्थव्यवस्थेत वाढ झाली आहे ही गोष्ट मी नाकारत नाही पण ती अभूतपूर्व नक्कीच नाही. २००५-२००८ हा यूपीएच्या कारकीर्दीतील तीन वर्षांचा काळ हा अर्थव्यवस्थेच्या 'वाढीचा सुवर्णकाळ' होता. त्या काळात सकल राष्ट्रीय उत्पादनाचा दर प्रतिवर्षी अनुक्रमे ९.५, ९.६ आणि ९.३ टक्क्यांनी वाढला



होता. पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात गेल्या नऊ वर्षांत अर्थव्यवस्थेचा वाढीचा वेग सरासरी ५.७ टक्के आहे. २०२३-२४ मध्ये अंदाजे ७.३ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे. ती जोडली तरीही सरासरी दर ५.९ टक्क्यांवरच राहील. वाढीचा हा दर अभूतपूर्व किंवा नेत्रदीपक नाही; तो समाधानकारक वाढ आहे, पण त्यातून आर्थिक वाढ पुरेशी होते आहे किंवा ती नीट पसरते आहे, असे मात्र म्हणता येत नाही. सरकारच्या आर्थिक धोरणामध्ये नेहमीच प्रत्यक्ष कर कमी असतील आणि अप्रत्यक्ष कर जास्त असतील या गोष्टीला प्राधान्य असते. हे अप्रत्यक्ष कर अनेकदा चढे आणि जाचक असतात. ते सहसा अनिवार्य घटक, रस्ते, रेल्वे, बंदरे आणि विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधांमध्ये भांडवली गुंतवणूक (शिक्षण आणि आरोग्य सेवेसाठी अपुऱ्या वाटपासह) आणि महिलांसारख्या विशिष्ट वर्गांना अनुदाने या निधीची उभारणी करण्यासाठी आकारले जातात. समाधानकारक विकासदराने काही वर्ग खूश झाले आहेत. हे समाधानी लोक कोण ते मी सांगू शकतो. त्यात मोठे आणि मध्यम कॉर्पोरेट्स; निव्वळ संपत्ती भरपूर असलेले लोक; बँकर्स; शेअर बाजारातील गुंतवणूकदार, व्यापारी आणि दलाल; अडचणीमधली मालमत्ता खरेदी करणारे लोक; सॉफ्टवेअर व्यावसायिक; मोठे व्यापारी; न्यायाधीश, चार्टर्ड अकाउंटंट, डॉक्टर आणि वकील यांसारखे व्यावसायिक; विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षक; सरकारी कर्मचारी; श्रीमंत शेतकरी; आणि सावकार आहेत. हे सगळे देशामधले समाधानी, आनंदी लोक आहेत. या परिस्थितीची काळी बाजू अशी आहे की एकीकडे समाधानी लोक आहेत आणि दुसरीकडे मागे पडलेले लोक आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# विद्यार्थ्याला मिळाले 200 पैकी 214 गुण

## तलाठी भरती : विजय वडेट्टीवारांकडून चौकशीची मागणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तलाठी भरती परीक्षेचा आणखी एक घोटाळा समोर आला आहे. एका विद्यार्थ्याला 200 पैकी 214 गुण मिळाले आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. आजपर्यंतच्या शैक्षणिक इतिहासातील हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. "तलाठी भरती परीक्षा" हा एक मोठा घोटाळा आहे. या संपूर्ण घोटाळ्याची SIT चौकशी व्हावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे, ट्विट करत त्यांनी ही मागणी केली आहे.**





"तलाठी भरती परीक्षा हा एक मोठा घोटाळा आहे. या संपूर्ण घोटाळ्याची SIT चौकशी व्हावी ही आमची मागणी आहे. 200 पैकी 214 गुण एका उमेदवाराला मिळत असेल तर परीक्षा घेणारी संपूर्ण यंत्रणा किती गंभीरतेने काम करतय आणि सत्ताधाऱ्यांनी पदभरतीचा कसा खेळखंडोबा करून ठेवलंय हे आता स्पष्ट होत आहे. मागणी, आणि ती पण SIT चौकशीची..? आतापर्यंत या सरकारने जितक्या SIT स्थापन केल्या, त्याचे निकाल काय आले ? हे माहीत असूनही, तुमचा इतका मिळमिळीत विरोध का ? एक लिमिट मध्ये राहून विरोध करायच्या म्हणजे विरोध पण दिसेल आणि ED पण येणार नाही. असं काही आहे का ?", असं विजय वडेट्टीवार यांनी ट्विटमध्ये लिहिलं आहे. तलाठी भरती परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा झाला असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी केला. या भ्रष्टाचारी आणि घोटाळेबाज सरकारला स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सत्तेतून खाली खेचण्याची गरज असल्याचेही रोहन सुरवसे पाटील म्हणाले. रोहन सुरवसे पाटील म्हणाले, "स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने केलेल्या ट्विट्द्वारे ही माहिती समोर आली आहे.

एकाच विद्यार्थ्याला वनरक्षक परीक्षेत चोपन्न गुण मिळाले आहेत. तर, तलाठी भरती परीक्षेत दोनशे पैकी दोनशे चौदा गुण मिळाले आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा असोत, की सरळ सेवा भरतीच्या परीक्षा असोत. या परीक्षांतील पारदर्शकता पूर्णपणे संपली असून, अहोरात्र मेहनत करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळण्याचे काम शिंदे-फडणवीस-पवार सरकार करीत आहे. या नतद्दष्ट सत्ताधाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या हिताशी काहीही देणे घेणे नसून, वशिलेबाजी आणि पैसे घेऊन सरकारी पदे पूर्णपणे विकली जात असल्याची शक्यता आहे. संपूर्ण तलाठी भरती परीक्षेची विशेष तपास पथकामार्फत चौकशी व्हावी. तसेच तलाठी भरती आणि वनरक्षक भरती रद्द करण्यात यावी," अशी मागणीही सुरवसे-पाटील यांनी केली आहे. तलाठी भरती परीक्षा हा एक मोठा घोटाळा आहे. या संपूर्ण घोटाळ्याची SIT चौकशी व्हावी ही आमची मागणी आहे. 200 पैकी 214 गुण एका उमेदवाराला मिळत असेल तर परीक्षा घेणारी संपूर्ण यंत्रणा किती गंभीरतेने काम करतय आणि सत्ताधाऱ्यांनी पदभरतीचा कसा खेळखंडोबा करून ठेवलंय हे आता स्पष्ट होत आहे. मागणी, आणि ती पण SIT चौकशीची..? आतापर्यंत या सरकारने जितक्या SIT स्थापन केल्या, त्याचे निकाल काय आले ? हे माहीत असूनही, तुमचा इतका मिळमिळीत विरोध का ? एक लिमिट मध्ये राहून विरोध करायच्या म्हणजे विरोध पण दिसेल आणि ED पण येणार नाही. असं काही आहे का ?", असं विजय वडेट्टीवार यांनी ट्विटमध्ये लिहिलं आहे.तलाठी भरती परीक्षेचा आणखी एक घोटाळा समोर आला आहे. एका विद्यार्थ्याला 200 पैकी 214 गुण मिळाले आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. आजपर्यंतच्या शैक्षणिक इतिहासातील हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल.

### तुम्हाला पराभवाची भीती आहे

“भारतीय जनता पार्टीला आव्हान देत संजय राऊत म्हणाले, तुम्हाला जनतेचा इतका प्रचंड पाठिंबा आहे असा तुम्ही दावा करता. हे भाजपाचे लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विष्णूचा १३ वा अवतार मानतात. मोदींमध्ये प्रभू श्रीरामांना घर देण्याची ताकद आहे, असं सांगतात, मग तुम्ही मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला का घाबरता? तुम्ही विष्णूचे १३ वे अवतार आहात ना? मग मतपत्रिकेवर निवडणूक घ्या. मोदींना मतपत्रिकेवर निवडणूक घेण्यात कसली भीती? तुम्ही जर मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला घाबरत असाल तर याचा अर्थ तुम्हाला पराभवाची भीती आहे. तुम्हाला माहिती आहे मतपत्रिकेवर निवडणूक घेतली तर ३३ कोटी देवही तुम्हाला वाचवू शकणार नाहीत. श्रीरामही वाचवणार नाहीत.वसेनेच्या ठाकरे गटातील खासदार संजय राऊत हे सातत्याने ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणूक घेण्याची मागणी करत आहेत. राऊत यांनी शनिवारी (६ डिसेंबर) पुन्हा एकदा तीच मागणी लावून धरली. खासदार राऊत यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, देशातील जनतेच्या मनात मतदान पद्धतीविषयी, ईव्हीएमविषयी संशय आहे. ईव्हीएमचा विषय आता हळूहळू सगळीकडे पोहोचला आहे.

# जरांगे पाटील २० जानेवारी रोजी मुंबईत येणारच

## आरक्षण देण्यासाठी कायदेशीर मार्ग तपासावे : अजित पवार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा आज कल्याण येथे संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विविध मुद्द्यांवर आपली रोखठोक मतं व्यक्त केली. आम्ही विकासासाठी सत्तेत सामील झालो आहोत, असे त्यांनी सुरुवातीला सांगून महाराष्ट्रात सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून चाललेल्या आरोप-प्रत्यारोपावर भाष्य केले. तसेच जितेंद्र आव्हाड यांचे नाव न घेता त्यांनी केलेल्या विधानावर टीका केली.**

वाचाळविरांची संख्या वाढली आहे. काहीजण विकासाचे बोलण्यापेक्षा नको त्या विषयावर बोलत आहेत”, असे अजित पवार म्हणाले. मराठा आरक्षणाच्या बाबत बोलत असताना अजित पवार म्हणाले, “मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहीजे, यात कुणाचंच दुमत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्यात एकमत आहे. परंतु आज राज्यात ६२ टक्के आरक्षण आधीपासूनच आहे. आता आणखी आरक्षण देण्यासाठी कायदेशीर मार्ग तपासावे लागतील. पण काही लोक टोकाची भाषा वापरत आहेत. मुंबईला येण्यासंबंधी घोषणा करत आहेत. डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांनी देशाला संविधान देऊन ७५ वर्ष झाली. आजही त्याच संविधानाच्या आधारावर देश मार्गक्रमण करत आहे. संविधानाने घालून दिलेल्या चौकटीचा आदर झाला पाहीजे. जर कायदा हातात घेण्याचा प्रयत्न कुणी केला, तर त्याचा मुलाहिजा ठेवायचा नाही. कायद्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ नाही, हेदेखील लक्षात ठेवा.” अजित पवार पुढे म्हणाले की, राज्यातील वेगवेगळे जातसमुदाय आरक्षण मागत आहेत. धनगर समाज एसटीमधून आरक्षण मागतोय. मात्र आदिवासी समाजाचीही मागणी आहे की, त्यांच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. राज्यातील सर्व वंचित, दुर्बल समाजाला इतर समाजांच्या बरोबरीने आणायचे आहे. ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगले आहेत. इथेही आदिवासी समाज राहतो. त्यांच्या विकासासाठी विविध प्रकल्पांचे काम चालू आहे.

सर समाजाच्या कल्याणासाठी, लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आपण सरकारमध्ये गेलो आहोत. सरकारमध्ये जाताना आमचा वैयक्तिक स्वार्थ नव्हता. महायुतीमधील पक्षांची विचारधारा वेगळी असली तरी महाराष्ट्राच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असेही ते म्हणाले.

### करोनात न थांबता काम केलं

मागे आम्ही शिवसेनेबरोबर सरकार स्थापन केले होते. शिवसेनेबरोबर करोनाच्या काळात काम करत होतो. त्यावेळी मी सकाळीच ८ वाजता मंत्रालयात जाऊन बसायचो. काही जण म्हटले, करोना झाला तर मराल आणि वर जाल. पण मी म्हटले, मेलो तर मेलो. पण लोकांचे प्रश्न सुटले पाहीजे. मंत्रालयच उघडले नाही, तर प्रशासन ठप्प होईल. चांद्यापासून ते बांद्यापर्यंतची यंत्रणा हलणार नाही. यंत्रणा हलविण्याची ताकद राज्यकर्त्यांमध्ये असावी लागते”, असे विधान अजित पवार यांनी केले.

# निवडणुकांसाठी भाजपचा मास्टरस्ट्रोक

## पंतप्रधान मोदी चंपारणमधून करणार प्रचाराला सुरुवात?

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भाजपने (BJP) कंबर कसली आहे. निवडणुकांसाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये पक्षांकडून रणनिती आखल्या जातात. याच दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM MODI) 13 जानेवारी रोजी बिहारमधील रमन मैदानात एका रॅलीला संबोधित करणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान मोदी हे बिहारमधून चंपारणमधून आगामी लोकसभा निवडणुकांसाठी प्रचाराला सुरुवात करणार असल्याची माहिती समोर येतेय.**



पक्षातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी पंतप्रधान मोदी हे बिहारमधील रस्ते आणि पुलांसह विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्याची शक्यता आहे. बिहारमध्ये 2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने सर्वसमावेशक योजना आखल्या आहेत. राज्यातील सर्व 40 जागा जिंकण्याचे पक्षाचे लक्ष्य आहे. एएनआयच्या वृत्तानुसार, पक्षाच्या सूत्रांचे म्हणणे आहे की पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये बिहारमध्ये अनेक रॅलींना संबोधित करू शकतात. सर्व प्रमुख रॅली 15 जानेवारीनंतर होण्याची अपेक्षा आहे, जेव्हा निवडणूक प्रचारावरील निर्बंध उठवले जातील. पीएम मोदी राज्यातील बेगुसराय, बेतिया आणि औरंगाबाद येथे तीन सभांना संबोधित करू शकतात. अमित शाह जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये सीतामढी, मधेपुरा आणि नालंदा येथे सभांना संबोधित करतील अशी माहिती देण्यात आलीये. जेपी नड्डा अनेक ठिकाणी रॅली काढू शकतात, विशेषत: त्यांचे लक्ष सीमांचल आणि बिहारच्या पूर्व भागावर असेल. 2019 च्या निवडणुकीपेक्षा यावेळी बिहारमधील राजकीय परिस्थिती वेगळी आहे. तेव्हा राज्यात जेडीयूसह भाजपची सत्ता होती. यावेळी ते विरोधी पक्षात आहेत, तर जेडीयू महाआघाडी सरकारचा भाग आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या नेत्यांची यशस्वीपणे एकजूट केली असून, भाजपसोबतच्या मागील युतीमध्ये बदल केला आहे. बिहारमधील लोकसभेच्या सर्व 40 जागांसाठी लढत निश्चित आहे, जिथे गेल्या निवडणुकीत एनडीएने 39 जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसने एक जागा जिंकली होती. पक्षातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी पंतप्रधान मोदी हे बिहारमधील रस्ते आणि पुलांसह विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्याची शक्यता आहे. बिहारमध्ये 2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने सर्वसमावेशक योजना आखल्या आहेत. राज्यातील सर्व 40 जागा जिंकण्याचे पक्षाचे लक्ष्य आहे. एएनआयच्या वृत्तानुसार, पक्षाच्या सूत्रांचे म्हणणे आहे की पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये बिहारमध्ये अनेक रॅलींना संबोधित करू शकतात. सर्व प्रमुख रॅली 15 जानेवारीनंतर होण्याची अपेक्षा आहे, जेव्हा निवडणूक प्रचारावरील निर्बंध उठवले जातील. पीएम मोदी राज्यातील बेगुसराय, बेतिया आणि औरंगाबाद येथे तीन सभांना संबोधित करू शकतात. अमित शाह जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये सीतामढी, मधेपुरा आणि नालंदा येथे सभांना संबोधित करतील अशी माहिती देण्यात आलीये. जेपी नड्डा अनेक ठिकाणी रॅली काढू शकतात, विशेषत: त्यांचे लक्ष सीमांचल आणि बिहारच्या पूर्व भागावर असेल. 2019 च्या निवडणुकीपेक्षा यावेळी बिहारमधील राजकीय परिस्थिती वेगळी आहे.भाजपने वेगवेगळ्या राज्यांमध्ये पक्षांकडून रणनिती आखल्या जातात. याच दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी 13 जानेवारी रोजी बिहारमधील रमन मैदानात एका रॅलीला संबोधित करणार आहेत.

### पक्षाचे इतरही नेते करणार प्रचार

» अमित शाह जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये सीतामढी, मधेपुरा आणि नालंदा येथे सभांना संबोधित करतील अशी माहिती देण्यात आलीये. जेपी नड्डा अनेक ठिकाणी रॅली काढू शकतात, विशेषत: त्यांचे लक्ष सीमांचल आणि बिहारच्या पूर्व भागावर असेल. 2019 च्या निवडणुकीपेक्षा यावेळी बिहारमधील राजकीय परिस्थिती वेगळी आहे. तेव्हा राज्यात जेडीयूसह भाजपची सत्ता होती. यावेळी ते विरोधी पक्षात आहेत, तर जेडीयू महाआघाडी सरकारचा भाग आहे. सर्व प्रमुख रॅली 15 जानेवारीनंतर होण्याची अपेक्षा आहे, जेव्हा निवडणूक प्रचारावरील निर्बंध उठवले जातील. पीएम मोदी राज्यातील बेगुसराय, बेतिया आणि औरंगाबाद येथे तीन सभांना संबोधित करू शकतात.

# राहुलच्या 'यात्रे'आधी जागावाटप व्हावं

## अखिलेश यादव यांचा काँग्रेसला इशारा

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि वायनाडचे (केरळ) खासदार राहुल गांधी 'भारत जोडो यात्रे'नंतर आता मणिपूर ते मुंबई अशी पदयात्रा काढणार आहेत. या यात्रेला 'भारत जोडो न्याय यात्रा' असं नाव देण्यात आलं आहे. १४ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता मणिपूरची राजधानी इम्फाळमधून सुरू होईल आणि मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात महाराष्ट्राची राजधानी मुंबईत थांबेल. तब्बल ६,७०० किमी लांब अशी ही पदयात्रा देशातल्या १५ राज्यांमधून जाईल. काँग्रेसने त्यांच्या सर्व मित्रपक्षांना या यात्रेत सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे.**



राहुल गांधी या यात्रेदरम्यान देशातील १५ राज्यांच्या ११० जिल्ह्यांमधून प्रवास करतील. या यात्रेतला सर्वाधिक काळ राहुल गांधी उत्तर प्रदेशमध्ये असतील. ते ११ दिवसांत उत्तर प्रदेशमध्ये १,०७४ किमी प्रवास करतील आणि या काळात २० जिल्ह्यांना भेट देतील. या यात्रेत उत्तर प्रदेशमधील काँग्रेसचा मित्रपक्ष आणि इंडिया आघाडीमधील सदस्य समाजवादी पार्टी सहभागी होणार का? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. यावर सपा प्रमुख आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी उत्तर दिलं आहे. अखिलेश यादव म्हणाले, या यात्रेआधी लोकसभेसाठी जागावाटप व्हायला हवं. अखिलेश यादव म्हणाले, सध्या तरी ही यात्रा केवळ काँग्रेसची आहे.

आम्हाला अपेक्षा आहे की इंडिया आघाडीत जितके विरोधी पक्ष आहेत, जसे की पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, लालू प्रसाद यादव आणि इतर सगळेच पक्ष जे काँग्रेसशी युती करून भाजपाविरोधात लढणार आहेत, त्यांची अशी इच्छा आहे की, या यात्रेआधी लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटप पूर्ण व्हावं. आधी जागावाटप, त्यानंतर यात्रा आणि मग निवडणूक असा क्रम असेल तर खूप भक्कमपणे सगळेचजण लढू शकतील. तुम्ही या यात्रेत सहभागी होणार का? असा प्रश्न विचारल्यावर अखिलेश यादव म्हणाले, राहुल गांधींची ही यात्रा होतेय, ही चांगली गोष्ट आहे. परंतु, सगळ्या पक्षांना असं वाटतं की या यात्रेआधी जागावाटप झालं पाहिजे. जागावाटप झालं तर यात्रेत अनेक लोक स्वतःहून मदतीसाठी येतील. निवडणूक लढणार आहे तो प्रत्येक उमेदवार जगबाबदारीने तिथे उभा असेल, यात्रेत सहभागी होईल.

# पंतप्रधान मोदींवरील वादग्रस्त वक्तव्ये भोवली

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी लक्षद्वीपचा दौरा करून या दौऱ्यातील काही फोटो त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर शेअर केले होते. यानंतर मालदीवमधील नव्या सरकारमधील काही नेत्यांनी त्यावर वादग्रस्त टिप्पणी केली. यावरून आता चांगलाच वाद पेटला आहे. मालदीवमधल्या सत्ताधारी पक्षाचे नेते झाहिद रमीझ यांनी मोदींच्या लक्षद्वीप दौऱ्यावर टीका केली.

भारत पैसे कमावण्यासाठी श्रीलंका आणि इतर लहान देशांच्या अर्थव्यवस्थेची नक्कल करत असल्याचं वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केलं होतं. मालदीव सरकारने याबाबत अधिकृत भूमिका जाहीर केली आहे आणि त्यांच्या मंत्र्याने केलेल्या या वक्तव्याशी सरकारचा संबंध नाही, असं म्हटलं आहे.

झाहिद रमीझ यांच्यापाठोपाठ मालदीवच्या युवा सक्षमीकरण, माहिती आणि कला विभागाच्या मंत्री मरियम शिउना यांनीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. मरियम शिउना यांनी मोदी यांना 'विदूषक' आणि 'इस्रायलची कठपुतली' म्हटलं होतं. मरियम शिउना यांना मालदीव सरकारने निलंबित केलं आहे. यांच्यासह मालशा शरीफ आणि महजून माजिद यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या दोन मंत्र्यांनीदेखील नरेंद्र मोदींबाबत वादग्रस्त टिप्पणी केली होती. मालदीव सरकारचे प्रवक्ते आणि मंत्री इब्राहिम खलील यांनी काही वेळापूर्वी आज तकशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या मंत्र्यांना त्यांच्या पदावरून तात्काळ निलंबित करण्यात आलं आहे.

# अभिनेते मानेंनी शिवबंधन बांधत केला ठाकरे गटात प्रवेश

आगामी निवडणुकांच्या दृष्टीकोनातून राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. पक्षप्रवेशही मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत, यामुळे राजकीय पक्षांना बळ मिळताना दिसत आहे. आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानी प्रसिद्ध मराठी अभिनेते किरण माने आणि बीडमधील काही कार्यकर्त्यांचा ठाकरे गटात प्रवेश झाला. उद्धव ठाकरे यांनी या सर्वांना शिवबंधन बांधून त्यांना ठाकरे गटात प्रवेश दिला. दरम्यान, यावेळी कार्यकर्त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना आपल्या घरात आल्यासारखं वाटतंय. पूर्वी शिवसैनिक होतो, आजही शिवसैनिक आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी ठाकरे गटाचे महत्वाचे नेतेही उपस्थित होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला पुन्हा शिवसेनेत प्रवेश देणार नसल्याची घोषणा केली. किरण माने यांनी आजवर मराठी नाटक, सिनेमे, मालिकाविश्वात अभिनय केलाय. ते बिग बॉस मराठी ४ मध्ये सहभागी होते. याशिवाय मुलगी झाली हो, सिंधूताई माझी माई या मालिकांमध्ये त्यांना काम केलंय. किरण माने यांनी परफेक्ट मिसमॅच, उलट सुलट या नाटकांमध्ये अभिनय केलाय. किरण माने आता अभिनय क्षेत्र गाजवून राजकीय क्षेत्रात कशी वाटचाल करणार, याची सर्वांना उत्सुकता आहे. यावेळी बोलताना किरण माने म्हणाले,"शिवसेना सर्वसामान्यांची आहे. राजकारण गढूळ झालेलं असताना एकटा माणूस लढत आहे. त्यामुळे मी एक संवेदनशील अभिनेता म्हणून माणूस म्हणून सोबत येण्याचा निर्णय घेतला आहे". "संविधान वाचवण्यासाठी मी पक्षामार्फत काम करेल.

# विजयपेक्षा कतरिनानं घेतलं जास्त मानधन!

बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि टॉलिवूड अभिनेता विजय सेतुपती हे सध्या त्यांच्या आगामी सिनेमामुळे चर्चेत आहेत. कतरिना आणि विजय आता 'मेरी ख्रिसमस' या चित्रपटामध्ये दिसणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. सध्या हे दोन्ही स्टार्स चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहेत. या चित्रपटातून पहिल्यांदाच कतरिना आणि विजयची जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या जोडीला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. हा एक हा क्राईम-थ्रिलर चित्रपट आहे. हा सिनेमा 12 जानेवारीला प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी येणार आहे. आता या चित्रपटासाठी कोणत्या कलाकाराने किती फी घेतली याबद्दल चर्चा सुरु आहे तर आता या चित्रपटासाठी स्टार्सने किती फी घेतली यावर नजर टाकूया. 'मेरी ख्रिसमस'मध्ये कतरिना कैफ मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटात कतरिना मारियाची भूमिका साकारत आहे. या चित्रपटात तिची विजयसोबत जोडी जमणार आहे. ती विजयसोबत रोमान्स करतानाही दिसली आहे. कतरिनाने या चित्रपटासाठी सर्वात जास्त मानधन घेतले आहे. तिने या चित्रपटासाठी 15 कोटी रुपये घेतले आहेत. 'मेरी ख्रिसमस' या क्राइम थ्रिलर चित्रपटात विजय सेतुपती वेगळ्या धाटणीची भूमिका करताना दिसणार आहे. आता विजय या चित्रपटात नेमकी कोणती भूमिका साकारतोय याबाबत माहिती समोर आलेली नाही.

# बिपाशा कमवते करोडो रुपये



आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया. बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे. जर तिच्या कार कलेक्शनबद्दल सांगायचं झालं तर, बिपाशाकडे ऑडी क्यू, 25 लाख किमतीच्या फोक्सवॅगन बीटल आणि 28 लाख किमतीच्या टोयोटा फॉर्च्युनर सारख्या आलिशान कार आहेत. आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि

# विघ्नेश शिवनचा आगामी प्रोजेक्ट वादात अडकला



चित्रपट निर्माते विघ्नेश शिवन यांचा चित्रपट LIC (लव्ह इन्शुरन्स कॉर्पोरेशन) ला विमा कंपनी लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कडून शीर्षक वापरल्याबद्दल नोटीस मिळाली आहे. नुकत्याच आलेल्या एका अहवालात हा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे विघ्नेश शिवन यांचा LIC प्रदर्शनाआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अहवालानुसार नोटीसमध्ये म्हटले आहे की, विमा कंपनीने चित्रपटाच्या टीमच्या नावाला विरोध केलाय. पुढील सात दिवसांत निर्मात्यांनी चित्रपटाचे नाव न बदलल्यास त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असेही या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. सध्या तरी विघ्नेश आणि टीमने या अहवालावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. लव्ह इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये अभिनेता आणि चित्रपट निर्माते प्रदीप रंगनाथन आणि क्रिती शेट्टी मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटात एसजे सूर्याही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये याची घोषणा करण्यात आली होती. या चित्रपटाची निर्मिती सेव्हन स्क्रीन स्टुडिओ आणि राउडी पिक्चर्स करत आहेत. या चित्रपटाच्या संगीताची धूरा लोकप्रिय संगीतकार अनिरुद्ध रविचंदर सांभाळणार आहे.

# भस्म आरतीमध्ये तल्लीन झाली 'अनुपमा'!



टिव्ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय शो म्हणजे 'अनुपमा'. या मालिकेमुळे अभिनेत्री रुपाली गांगुली घराघरात पोहचली. तिला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आज प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली उज्जैन बाबा महाकालच्या भस्म आरतीमध्ये सहभागी झाली होती. आरतीनंतर रुपालीने गर्भगृहात जाऊन महाकालचे आशीर्वाद घेतले. सध्या रुपालीचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. एएनआयने सोशल मीडियावर रुपालीचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती भक्तांसह बाबा महाकालच्या भक्तीत तल्लीन झाली. रुपालीने देवाचे आशीर्वाद घेतले आणि त्यांचे आभार मानले. आज सकाळी रूपाली गांगुली भगवान महाकालच्या मंदिरात पोहोचली होती. तिथे तिने 'भस्म आरती'मध्ये भाग घेतला आणि भगवान महाकालचे आशीर्वाद घेतले. याआधीही 2023 मध्ये रुपाली गांगुली उज्जैनला गेली होती. यावेळी मिडियासोबत बोलताना रुपालीने सांगितले की, ती महाकालच्या दर्शनासाठी अनेकदा गेली आहे. त्याच्या आशिर्वादानेच तिला तिच्या क्षेत्रात यश मिळाले आहे. ती महादेवाची मोठी भक्त आहे. अभिनेत्री पुढे म्हणाली की, '2020 मध्ये मी पहिल्यांदा इथे आले आणि इथेच मला 'अनुपमा' या मालिकेत काम करण्याची ऑफर मिळाली. आता मी महादेवाकडे काही मागायला नाही तर त्यांचे आभार मानायला आली आहे.' त्यानंतर रुपालीने इंस्टाग्रामवर स्टोरीमध्ये तिचा एक फोटो शेअर केला ज्यात तिने कॅप्शनमध्ये जय महाकाल असे लिहिले होते. रुपाली गांगुली एक उत्तम अभिनेत्री आणि थिएटर कलाकार आहे. 'अनुपमा' या मालिकेपूर्वी 'सारा भाई वर्सेस सारा भाई' या मालिकेत दिसली होती. आता रुपालीला बरेच लोक अनुपमा या नावाने ओळखतात.

टिव्ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय शो म्हणजे 'अनुपमा'. या मालिकेमुळे अभिनेत्री रुपाली गांगुली घराघरात पोहचली. तिला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आज प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली उज्जैन बाबा महाकालच्या भस्म आरतीमध्ये सहभागी झाली होती. आरतीनंतर रुपालीने गर्भगृहात जाऊन महाकालचे आशीर्वाद घेतले. सध्या रुपालीचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. एएनआयने सोशल मीडियावर रुपालीचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती भक्तांसह बाबा महाकालच्या भक्तीत तल्लीन झाली. रुपालीने देवाचे आशीर्वाद घेतले आणि त्यांचे आभार मानले. आज सकाळी रूपाली गांगुली भगवान महाकालच्या मंदिरात पोहोचली होती. तिथे तिने 'भस्म आरती'मध्ये भाग घेतला आणि भगवान महाकालचे आशीर्वाद घेतले. याआधीही 2023 मध्ये रुपाली गांगुली उज्जैनला गेली होती. यावेळी मिडियासोबत बोलताना रुपालीने सांगितले की, ती महाकालच्या दर्शनासाठी अनेकदा गेली आहे.

# टीम इंडियात कुणाला संधी मिळणार?

## अफगाणिस्तानविरुद्धच्या T20 मालिकेत संघ कसा असेल?

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत विरुद्ध अफगाणिस्तान (IND VS AFG) टी-20 मालिका 11 जानेवारीपासून खेळवली जाणार आहे. टीम इंडिया (TEAM INDIA) 11 जानेवारीपासून अफगाणिस्तानविरुद्धच्या (INDIA VS AFGHANISTAN) तीन सामन्यांच्या T20 मालिकेत सहभागी होणार आहे. भारतीय संघ व्यवस्थापन या मालिकेसाठी कोणत्या खेळाडूंना संधी देते हे पाहणे औत्सुक्याचं ठरणार आहे. संघ व्यवस्थापनाकडून आज भारतीय संघातील खेळाडूंची नाव जाहीर करण्यात येणार आहेत. अफगाणिस्तान संघ काहीसा कमजोर असला तरी, आगामी विश्वचषकाच्या दृष्टीने अफगाणिस्तान विरुद्धची टी20 मालिका भारतासाठी महत्त्वाची ठरणार आहे.**




अफगाणिस्तान विरुद्धच्या मालिकेसाठी टीम इंडियाच्या घोषणेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहलीला विश्रांती देण्यात येण्याच्या चर्चा आहेत. दरम्यान, या मालिकेत विराट आणि रोहितला संधी दिल्यास हे दोघेही टी-20 विश्वचषक 2024 चा भाग असतील, असं मानलं जात आहे. पण, या मालिकेत दोघेही खेळण्याची शक्यता कमी आहे. आगामी इंग्लंड कसोटी मालिका लक्षात घेता संघ निवड समिती अफगाणिस्तान मालिकेत स्टार खेळाडूंना विश्रांती देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही तज्ज्ञांच्या मते, अफगाणिस्तानविरुद्धच्या टी20 मालिकेमध्ये रोहित शर्मा खेळण्याची शक्यता आहे, पण संघ समिती विराट कोहलीला आराम देईल, असं म्हटलं जात आहे. सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्यासारख्या महत्त्वाच्या टी-20 खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे, भारतीय संघ व्यवस्थापन टी-20 विश्वचषकासाठी संघ नियोजन करताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यानंतर, इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेच्या पार्श्वभूमीवर संघ व्यवस्थापन जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजसारख्या वेगवान गोलंदाजांना विश्रांती देण्याच्या विचारात आहे.

अशा परिस्थितीत, टी-20 विश्वचषकासाठी संघ निवड आणि अफगाणिस्तान मालिकेत समतोल शोधण्यासाठी संघ व्यवस्थापनाकडून फारसं काही साध्य होणार नाही. टी-20 विश्वचषकासाठी संभाव्य संघाबाबतच्या सर्व प्रश्नांची उत्तरे अफगाणिस्तान मालिकेत मिळण्याची शक्यता फार कमी आहे. आयपीएम 2024 (IPL 2024) मधील भारतीय खेळाडूंच्या कामगिरीवर टी20 विश्वचषकात कोणाला स्थान मिळेल किंवा नाही ठरेल. अफगाणिस्तानविरुद्ध भारताचा संघ कसा असू शकतो, हे पुढे वाचा. रोहित शर्मा (कर्णधार), ईशान किशन, यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, रिंकू सिंह, जितेश शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, शिवम दुबे, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा, आवेश खान आणि मुकेश कुमार. अफगाणिस्तान विरुद्धच्या मालिकेसाठी टीम इंडियाच्या घोषणेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहलीला विश्रांती देण्यात येण्याच्या चर्चा आहेत. दरम्यान, या मालिकेत विराट आणि रोहितला संधी दिल्यास हे दोघेही टी-20 विश्वचषक 2024 चा भाग असतील, असं मानलं जात आहे. आगामी इंग्लंड कसोटी मालिका लक्षात घेता संघ निवड समिती अफगाणिस्तान मालिकेत स्टार खेळाडूंना विश्रांती देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही तज्ज्ञांच्या मते, अफगाणिस्तानविरुद्धच्या टी20 मालिकेमध्ये रोहित शर्मा खेळण्याची शक्यता आहे, पण संघ समिती विराट कोहलीला आराम देईल, असं म्हटलं जात आहे. सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्यासारख्या महत्त्वाच्या टी-20 खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे, भारतीय संघ व्यवस्थापन टी-20 विश्वचषकासाठी संघ नियोजन करताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यानंतर, इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेच्या पार्श्वभूमीवर संघ व्यवस्थापन जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजसारख्या वेगवान गोलंदाजांना विश्रांती देण्याच्या विचारात आहे. अशा परिस्थितीत, टी-20 विश्वचषकासाठी संघ निवड आणि अफगाणिस्तान मालिकेत समतोल शोधण्यासाठी संघ व्यवस्थापनाकडून फारसं काही साध्य होणार नाही.

### शर्मा आणि विराट कोहली बाहेर?

» या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहलीला विश्रांती देण्यात येण्याच्या चर्चा आहेत. दरम्यान, या मालिकेत विराट आणि रोहितला संधी दिल्यास हे दोघेही टी-20 विश्वचषक 2024 चा भाग असतील, असं मानलं जात आहे. पण, या मालिकेत दोघेही खेळण्याची शक्यता कमी आहे. आगामी इंग्लंड कसोटी मालिका लक्षात घेता संघ निवड समिती अफगाणिस्तान मालिकेत स्टार खेळाडूंना विश्रांती देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही तज्ज्ञांच्या मते, अफगाणिस्तानविरुद्धच्या टी20 मालिकेमध्ये रोहित शर्मा खेळण्याची शक्यता आहे, असं म्हटलं जात आहे. सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्यासारख्या महत्त्वाच्या टी-20 खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे, भारतीय संघ व्यवस्थापन टी-20 विश्वचषकासाठी संघ नियोजन करताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यानंतर, इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेच्या पार्श्वभूमीवर संघ व्यवस्थापन जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजसारख्या वेगवान गोलंदाजांना विश्रांती देण्याच्या विचारात आहे.

# अंपायरच्या निर्णयामुळे सारेच झाले अचंबित

## अंपायरने पहिल्यांदा दिले आऊट नंतर बदलला निर्णय

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आक्रमक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलच्या एका फटक्याने बीग बॅश लीगमध्ये सर्वांना अचंबित करणारे प्रकार घडले आहेत. दरम्यान, शनिवारीही असाच एक प्रकार घडला. सिडनी सिक्सर्स आणि मेलबर्न स्टार्स दरम्यान झालेल्या सामन्यात थर्ड अपायरने चुकीचे बटन दाबल्यामुळे फलंदाजाला बाद घोषित करण्यात आले. मात्र, अपायरकडून लगेच हा निर्णय बदलण्यात आला.**

त्यामुळे मैदानावरिल सर्वच खेळाडू अचंबित झाले आहेत. हा सामना ऑस्ट्रेलियातील मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर खेळवण्यात आला होता. सर्वांना हैराण करणारा हा प्रकार सिडनी सिक्सर्सचा संघ फलंदाजी करत असताना घडला. इमाद वसीने टाकलेल्या चेंडूवर जेम्स विंगने जोरादार शॉट मारला. दरम्यान, त्याने मारलेला चेंडू इमाद वसीमच्या हातावर लागला आणि त्यानंतर स्टम्पसला लागला. त्यानंतर मेलबर्न स्टार्सच्या खेळाडूंनी जेम्सला बाद करण्यासाठी अपील केली. त्यामुळे मैदानावरिल अंपायरने



3RD अंपायरकडे जाण्याचा निर्णय घेतला. अपील 3RD अंपायरकडे गेल्यानंतर रिप्लेमध्ये स्पष्टपणे दिसत होते की, जोश फिलीप पूर्णपणे क्रिजच्या आतमध्ये आहे. मात्र, तरीही 3RD अंपायरने स्क्रीनवर आऊटचा इशारा दिला. अंपायरच्या या इशारामुळे सारे समालोचकही हैराण झाले होते. मात्र, यावेळी मैदानावरिल अंपायरने जोश फिलीपने थांबण्यास सांगितले आणि म्हणाले की, काहीतरी चुकतय. यानंतर थर्ड अंपायरनेही त्याचा स्क्रीनवरिल निर्णय बदलला आणि नॉट आऊटचा इशारा दिला.

### 108 मीटरचा लांबलचक षटकार

» बिग बॅश लीगमध्ये ही आयपीएलप्रमाणे जोरदार फटकेबाजी पाहायला मिळते. अनेक खेळाडू लांबलचक षटकार लगावताना दिसतात. असाच एक षटकार मेलबर्नच्या संघातील खेळाडूने लगावलाय. ब्यू वेबस्टरने ब्रेंडन डोगेट गोलंदाजीसाठी आला असता 108 मीटरचा लांबलचक षटकार लगावलाय.

सामन्यात सिडनी सिक्सर्सकडून विंसने 57 चेंडूमध्ये 79 आणि डेनियल ह्युजेसने 32 चेंडूमध्ये 41 धावांची खेळी केली. या दोघांनी केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर सिडनी सिक्सर्सनी मेलबर्नच्या संघाच 6 विकेट्सने पराभव केला. सिडनी सिक्सर्सकडून टॉड मर्फीने 2 तर टॉम करण आणि बेन द्वारशुईसने प्रत्येकी 1 विकेट पटकावली. यापूर्वी मॅक्सवेल आणि मार्कस स्टोयनिस आणि हिल्टन कार्टराईटच्या दमदार कामगिरीच्या जोरावर मेलबर्नचा संघ 20 षटकांअखेर 156 धावांपर्यंत मजल मारू शकला.